International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.5 May– June 2015

# कजरी : एक उत्तर भारतीय लोकगीत प्रकार - एक अवलोकन

**डॉ. विनोद ठाकूरदेसाई**
संगीत व नाट्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना -**

भारतीय अभिजात संगीताचे मुख्यत: तीन प्रकार पडतात. १) शास्त्रीय संगीत २) उपशास्त्रीय संगीत आणि ३) सुगम संगीत. उपशास्त्रीय संगीताचा गेल्या दीडशे ते दोनशे वर्षांत शास्त्रीय संगीताइतकाच विकास झाला आहे. उपशास्त्रीय संगीताचा मुख्य प्रकार म्हणजे ठुमरी. ठुमरीच्या मुख्य दोन शैली प्रचलित आहेत. १) पूरब शैली २) पंजाब शैली.

पूरब शैलीमध्ये लखनवी शैली व बनारसी शैली अशा दोन शैली मानल्या गेल्या आहेत. ठुमरी बरोबरच 'दादरा' हा ठुमरीसारखाच वेगळा पण जलद जाणारा गीतप्रकार ठुमरी इतकाच प्रसिद्ध आहे. मुळात हे दोनही प्रकार उत्तर भारतीय लोकसंगीतातून आले आहेत. आज अभिजात संगीताच्या मैफलीमध्ये रंगमंचावर केवळ दादरा - ठुमरीच नव्हे तर कजरी, चैती, झुला, सावनी इत्यादी उत्तर प्रदेशीय लोकगीतप्रकारही गायले जातात. परंतु लोकसंगीतातील रूप थोडेसे पालटून शास्त्रीय संगीताच्या मैफलीत त्यांचे सादरीकरण होते. ठुमरी कुटुंबात मोडणारा आणि लोकसंगीताशी नाळ जोडणारा एक प्रकार म्हणजे कजरी.

कजरी हा उत्तर प्रदेशामध्ये गायल्या जाणाऱ्या प्रचलित लोकसंगीतातील एक महत्त्वाचा गानप्रकार किंवा गीतप्रकार आहे. मुळात 'कज्जल' अर्थात 'काजळ' या शब्दातून 'कज्जली' हा शब्द तयार झाला आहे. बोलीभाषेमध्ये 'कजली' किंवा 'कजरी' असा शब्दप्रयोग प्रचलित झाला आहे.

'झुल्यावर झुलणारे रसिक शिरोमणी श्याम आणि वृक्षभान किशोरी राधा' हे कजरीचे अधिनायक होत. कजरी म्हणजे उत्तर भारतीय बोलीभाषांमध्ये जिचा अर्थ कृष्णवर्णी, काळ्याकुट्ट मेघांची, काळ्या श्रावण रात्रीची, काळ्याभोर नेत्रांच्या वर्षावाची, घन:श्यामाची, काळ्या केशसंभाराची, चमकणाऱ्या विद्युल्लतेची व नायिकेची मनोदशा - संयोग व वियोग शृंगाराच्या माध्यमाने दर्शन घडविणाऱ्या गीतप्रकाराची आकर्षक अभिव्यक्ती कजरीमध्ये असते. या काव्यप्रकारामध्ये वर्षा ऋतूचे वर्णन आढळते. विरह, शृंगार असे दोनही रस या काव्यप्रकारात आढळतात. 'कारे कारे बादल, घनघोर घटा, चमकणारी बिजली, रैन अंधेरी' अशा आशयाचे शब्द घेऊन त्यातून शृंगार व विरहाच्या छटा कजरी गाताना दाखविल्या जातात.

कृष्णपक्षीय तृतीया हे कज्जली किंवा कजरी पर्व मानतात. स्त्रिया या दिवसात नवनवीन वस्त्राभूषणे परिधान करतात आणि कज्जली देवीची पूजा करतात. त्या दिवशी एकत्र बसून संपूर्ण रात्र कजरी गातात. ही लोककला असल्याने वर्षा ऋतूमध्ये झाडाच्या फांद्यांना झुले बांधून स्त्रिया वेगवेगळ्या कजऱ्या गाऊन झुला झुलवतात. विरहिणी नायिका आपल्या सखीला म्हणते,

स्थायी - बादल बरसे, बिजरी चमके
जियरा ललचे, मोरा सखियाँ।
अंतरा - सइया घरे न अइले
पानी बरसन लागे ला, मोरा सखिया॥

वृत्तात ताल देऊन वाकूनही कजरी गायली जाते. उदा. -

कहो चितलाके, शीश नवाके
गणपति, बॉकेना। सवलिया सुत
गिरिजा के ना

पूर्वी कजरी आखाडा आणि दंगलमध्येसुद्धा गात असत. एकाच गुरुचे अनेक शिष्य पूर्ण रात्र या दंगल आणि मुकाबल्यामध्ये भाग घेत असत. गंगा दशहऱ्याच्या वेळी आखाड्यामध्ये ढोलकाची पूजा करून कजरी गायनास सुरुवात होत असे. तर काही आखाड्यांमध्ये अनंत चतुर्दशीपर्यंत तर काही ठिकाणी अश्विन कृष्णाष्टमीपर्यंत कजरी गायली जात असे.

लोकधुनांमध्येसुद्धा कजरी वाजविली जाते. परंतु शास्त्रीय संगीताच्या मंचावर कजरी मूळचे रूप थोडेसे पालटून आल्याचे दिसते. लोकसंगीतामध्ये कजरी गायनाच्या साथीला ढोलक, झांझ इत्यादी वाद्य असतात तर अभिजात संगीताच्या मंचावर तबला व हामोनिअम किंवा सारंगीच्या साथीने कजरी गायली जाते. पीलू, खमाज, काफी या रागांमध्ये आणि दादरा, केरवासारख्या तालांमध्ये कजरी अधिक उठून दिसते.

कजरी हा विशेषत: बनारसच्या गायिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. सरी बरसू लागल्या की 'सखी', 'सहेली' आमराईमध्ये झुला टांगून त्यावर झोके घेत जेव्हा गाणी म्हणतात तेव्हा त्यामध्ये केवळ परदेशी गेलेल्या 'सावरियाँ'ची आठवण होत नाही तर 'मैके'मध्ये - माहेरी आठवण काढत असलेल्या आई - बाबांची व आपल्याला घेऊन जाण्याकरिता येणाऱ्या 'भैय्या'ची अर्थात भावाची आठवण नवविवाहितांना होत असते. खालील कजरीमध्ये नायिका 'मैके' म्हणजे माहेरी न जाण्याचा निर्धार करताना दिसते.

मोरे भैय्या आइले अनवैयवा
सावनबा में न जइबो न न दी
सोने की थाली में जेवना परोसु
चाहे भैय्या खाये चाहे जाये
शावनमा ऐं ना जइबो ननदी

ही झाली लोकगीतातली कजरी! निसर्गवर्णन व नायिकेची मनोदशा असे दोन्ही विषय कजरीच्या काव्यात आढळून येतात. तर बनारसी कजरीचे आणखी एक उदाहरण पुढीलप्रमाणे देता येईल.

काहे कर लूँ गुमान गोरी सावन में
छाई घटा घनघोर बिजुरी चमकी चँदु और
पडे बूँदन फुहार गोरी सावन में

वरील कजऱ्या प्रसिद्ध करण्यामध्ये श्रीमती सिद्धेश्वरी देवी व गिरिजा देवी यांचा मोठा सहभाग आहे.

नही आये घनश्याम
घिर आयी बदरी
बैठी सोचे ब्रिजवास
तू न मेरो लाज धाम
आयी सावन बहार,
मुझे मोरवा पुकार
पडे बुंदन फुहार,
घेरि आयी बदरी॥

या लक्ष्मण मिर्जापूरीच्या ठुमरी अंगाने जाणाऱ्या कजरीमध्ये विरहिणी राधा आपल्या विरहव्यथेची वेदना व्यक्त करते. लक्ष्मण मिर्जापुरींची आणखी एक प्रसिद्ध कजरी आहे की जी ठुमरी म्हणून सांगून अनेक कथ्थक नृत्य कलाकार या कजरीवर नृत्यभाव प्रस्तुत करतात. परंतु ही एक मिर्जापुरी कजरी आहे.

बैठी सोचे बृजभाव सूनो लागे मेरो धाम
नहीं आए घनश्याम... घिरी आयी बदरी...
आयी सावन की बहार... करे मोरवा पुकार
पडे बूंदन फुहार... घिरी आयी बदरी...
कान्हा हमें बिसराय... रहें सौतन लगाय
करुं कौन उपाय... घिरी आयी बदरी...

नदीच्या किनारी, बागांमध्ये, लोकसंगीताच्या मंचावर तसेच शास्त्रीय संगीताच्या प्रतिष्ठित मंचावरून या कजरीचा आविष्कार होत असतो. इतका हा काव्यप्रकार, गानप्रकार श्रेष्ठ आहे. केवळ स्त्रियाच नव्हे तर पुरुष कलाकारांनीही कजरी गायल्याची उदाहरणे आढळून येतात. केवळ निसर्ग, विरह, वर्षा ऋतूचेच वर्णन नव्हे तर राजकीय घडामोडींचे वर्णन करणाऱ्याही कजऱ्या रचल्या गेल्याचे दिसून येते.

गांधी शांती पढाए। खादी को अपनाए
घुम घुम देश जगाए। चंद्र सुदर्शन लाए

ही कृष्णचंद्ररचित ठुमरीवजा कजरी राजकीय घडामोडीशी संबंधित आहे.

भूकंपाचे विदारक वर्णन करणारी कजरीसुद्धा रचली गेली आहे.

का सुनाई हम भूडोल का बयनवा... हो...
अबकि आएल जो भूडोल। धरती गईल सारी डोल।
हीले लागल सारे शहर का मकनवा... हो...
का सुनाई हम भूडोल का बयनवा हो...

भक्तिभाव दर्शविणारी कजरी -

हमेशा भजा करो तू हरि।
हरि बिन कोई न जल्दीतरी।
तरी जब भजी हर घडी।

अशा सर्व विषयांचे वर्णन करणाऱ्या अनेक कजऱ्या या उत्तर प्रदेशीय लोकसंगीतामध्ये दिसून येतात.

कजरीचा प्रसार व प्रचार अवध, भोजपूर, बनारस, मिर्जापूर, बुंदेलखंड आणि जवळपासच्या प्रांतात झाल्याचे दिसून येते. कजरी हा येथील सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सुप्रसिद्ध कवी भरतेंदु यांचा काळ हा कजरीचा सुवर्णकाळ मानला जातो.

कजरीचे मुख्यत: दोन प्रकार पडतात. १) मिर्जापुरी कजरी २) बनारसी कजरी

१) मिर्जापुरी कजरी -

**तुम बिन मोरे बिदेसी पियरवा**
**कैसे कटे बरसात॥**

२) बनारसी कजरी -

काहे कर हूं गुमान
गोरी सावन में॥
किंवा
रुमझुम के बरसन लागी बदरियाँ॥

**निष्कर्ष -**

१) भारतीय संगीत हे निसर्गाशी नाते जोडणारे संगीत आहे. कजरी हा असाच एक गीतप्रकार आहे की ज्याच्यामध्ये आकाशात काळ्याकुट्ट ढगांनी गर्दी केल्यावर ज्या पावसाच्या सरी बरसू लागतात त्याचे मनोवेधक चित्रण कजरी करते.

२) उत्तर भारतीय संगीत हे किती वैविध्यपूर्ण आहे हे या गीतप्रकारावरून दिसून येते. मानवी भावभावनांची अभिव्यक्ती संगीतामधून करताना मानवी जीवनाचे निसर्गाशी कसे नाते आहे याची अनुभूती हे लोकसंगीत करून देते.

३) ढोलक, झांज ही लोकसंगीतातील वाद्ये, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाशी संबंधित विषय, त्यातील स्त्री-पुरुष कलाकारांचा सहभाग यामुळे कजरी किंवा इतर उपशास्त्रीय प्रकारांना संजीवनी मिळाली. शिवाय शास्त्रीय संगीतामध्ये तबला, हार्मोनियम किंवा सारंगीच्या साथीने याच लोकगीतप्रकारांचा एक सौंदर्यपूर्ण आविष्कार रंगमंचावर झाल्याचे दिसून येते.

४) रागबंधने जरी शिथिल असली तरी उपशास्त्रीय संगीत सादर करताना त्या प्रत्येक प्रकारांची सादरीकरणातील स्वत:ची एक शिस्त असल्याचे दिसून येते.

५) कजरी हा प्रकार केवळ उत्तर प्रदेशापुरताच मर्यादित राहिला नाही तर आज अभिजात संगीताच्या व्यासपीठावरून तो सर्वत्र गायला जातो. श्रीमती गिरिजा देवी, पं. छन्नुलाल मिश्रा, सिद्धेश्वरी देवी, रसूलनबाई, सविता देवी, लक्ष्मी शंकर आदी कलाकारांचा कजरी गायनामध्ये मोलाचा सहभाग आहे.

**संदर्भ -**

१) मनके : भाव, सुर, लय के - पं. विजयशंकर मिश्र, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

२) ठुमरी : एक गानविद्या - डॉ. चित्रा मोडक, विजय प्रकाशन, नागपूर.

३) ठुमरी विशेषांक - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, १९९१.

४) ठुमरी एवं महिला कलाकार - पूर्णिमा द्विवेदी - अनुभव पब्लिशिंग हाऊस, इलाहाबाद.